


www.attalmat.com

# अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष -19, अंक-36 ■ छत्रपती संभाजीनगर, दि. सोमवार, 11 मे 2026 ■ किंमत 2 रूपये, पाने -4

# 'जब तक सूरज चाँद रहेगा, महाराणा तेरा नाम रहेगा'

## गगन भेदी घोषणांनी हिंदूसूर्य मेवाड नरेश महाराणा प्रताप यांची जयंती साजरी; विविध सामाजिक उपक्रम

- वाहन रॅलीत महिलांची विशेष उपस्थिती
- अश्वनृत्य, डमरू वादन ठरले मुख्य आकर्षण
- गुलाल मुक्त व शिस्तबद्ध मिरवणूक
- काही लोकप्रतिनिधींनी पाठ फिरवली





**दिनेश परदेशी, ८२७५५०३५७३**
**(अट्टल मत विशेष प्रतिनिधी)**
**छत्रपती संभाजीनगर**

हिंदूसूर्य विरशिरोमणी मेवाड नरेश महाराणा प्रताप यांची ४८६ वी जयंती छत्रपती संभाजीनगर शहरात मोठ्या धुमधडाक्यात साजरी करण्यात आली.

महाराणा प्रताप उद्यान येथील अश्वारूढ महाराणा प्रताप यांच्या पुतळ्यास कॅबिनेट मंत्री अतुल सावे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर 'जब तक सूरज चाँद रहेगा, महाराणा तेरा नाम रहेगा' याच्यासह इतर गगनभेदी घोषणांनी परिसर दणाणून गेला. भगव्या उत्साहात रॅलीला प्रारंभ झाला. रॅलीला कॅबिनेट मंत्री अतुल सावे यांनी झेंडा दाखवून शुभारंभ केला. विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दिवसभर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

सायंकाळी छत्रपती संभाजी महाराज चौक येथून वाजत गाजत शोभायात्रा काढण्यात आली रात्री दहा वाजता



महाराणा प्रताप उद्यान कॅनॉट प्लेस येथे संपन्न झाली. शोभायात्रेत सजीव देखावे, वेशभूषा अश्वांचे नृत्य मध्यप्रदेशातील डमरू वादन शोभा यात्रेतील प्रमुख आकर्षण होते

**मान्यवरांची प्रमुख उपस्थिती –** या कार्यक्रमास कॅबिनेट मंत्री अतुल सावे, खासदार कल्याण काळे, भाजप शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे, सभापती अनिल मकरिये, माजी अर्थमंत्री भागवत कराड, माजी आमदार उदय राजपूत, महापौर समीर राजूरकर, उपमहापौर राजेंद्र जंजाळ, अपर विभागीय आयुक्त खुशालसिंग परदेशी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

तसेच भागवत बिघोत, कवरसिंग बैनाडे, नगरसेवक पदमसिंह राजपूत, विजयसिंह झाला, उत्सव समिती अध्यक्ष सचिन बैनाडे, जगतसिंग परिहार, जनसेवक, रामसेवक, आरोग्यसेवक म्हणून ज्यांची ओळख आहे असे डॉ. जीवन राजपूत, संतोष राजपूत, अंजिली कोकुल्डे, तोताराम बहुरे, सुभाष महेर, महेंद्र बारवाल, लालचंद ताटू, सुप्पडसिंग राजपूत, सुदाम राजपूत, काळूराम सिंगल, अशोक शेवगण, चंदा राजपूत, भारती राजपूत आणि भाग्यश्री राजपूत, विनोद राजपूत यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले. समाजबांधवांचा मोठा प्रतिसाद यामुळे कार्यक्रमाला वेगळेच स्वरूप प्राप्त झाले.

### ५०० मोटारसायकलींचा सहभाग, रॅलीला विशेष आकर्षण

जिल्हाभरातून आलेल्या सुमारे ५०० मोटारसायकलींमुळे रॅलीला विशेष आकर्षण प्राप्त झाले. रॅलीमध्ये आकर्षक रथावर महाराणा प्रताप आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमांची मिरवणूक काढण्यात आली. शहरातील विविध प्रमुख मार्गांवरून ही रॅली मोठ्या उत्साहात पार पडली.



### शोभायात्रेत पुतळा आवश्यच; तरूणांनी खंत व्यक्त केली

"जसा उत्साहात जयंती सोहळा पाहिजे तसा उत्साह दिसून आला नाही. तसेच आपसांत असलेले हेवेदावे, इगो याची छलक ही दिसून आल्याचे तरूणांनी अट्टलमतशी बोलताना सांगितले ते म्हणाले की, शोभायात्रेत अर्धाकृती पुतळा किंवा अश्वारूढ पुतळा आवश्यक पाहिजे होता.

### इतिहासातून प्रेरणा घेण्याचे आवाहन

रॅलीच्या समारोपप्रसंगी बोलताना अपर विभागीय आयुक्त खुशालसिंग परदेशी यांनी समाजबांधवांना इतिहास अंगीकारण्याचे आवाहन केले. समाजाने आपल्या गौरवशाली इतिहासातून प्रेरणा घेत स्वाभिमान, एकता आणि संस्कार जपले पाहिजेत, असे ते म्हणाले. कार्यक्रमाच्या शेवटी मान्यवरांनी महाराणा प्रताप यांच्या शौर्य, त्याग आणि राष्ट्रभक्तीचा गौरव करत युवकांना इतिहासातून प्रेरणा घेऊन समाजहितासाठी कार्य करण्याचे आवाहन केले.

## शिवराणा सेवा संघातर्फे पुंडलिकनगरात शूरवीर महाराणा प्रताप यांना अभिवादन

शिवराणा सेवा संघातर्फे पुंडलिकनगरात शूरवीर महाराणा प्रताप यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. माजी सैनिक प्रेमसिंह राजपूत, एल. डी. ताटू यांनी महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. यावेळी महाराणा प्रताप महाराजांच्या शौर्यकथेला नव्याने उजाळा दिला. यशस्वितेसाठी नारायण महेर, आनंद बारवाल, शाम नागलोत, विजय बारवाल, गणेश राजपूत, प्रवीण राजपूत, सूर्यकांत तुपकर, रामदास पदार, संदीप राजपूत, अजबसिंह नागलोत, संगीता ताटू, आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रेमसिंग चुगडे यांनी केले.

## होनाजी नगर येथे महाराणा प्रतापसिंह जयंती उत्साहात साजरी

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

जटवाडा रोड, महाराणा प्रतापसिंह चौक, होनाजी नगर येथे क्रांती सूर्य महाराणा प्रतापसिंह यांच्या ४८६ व्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. सकाळी महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी राधा स्वामी कॉलनी, रामेश्वर नगरी, सारा वैभव व पोलीस कॉलनी येथील समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमास डॉ. जीवन राजपूत, नगरसेवक अशोकभाऊ हिवराळे, प्रा. टी. आर. पाटील, अनिल पवार, चैनसिंग राजपूत, प्रा. भिमसिंग कहाटे, महेंद्र बारवाल, सतीश मचिये,डी.जे.राजपूत, हर्षल सुलाने, श्यामलता राजपूत, डी जे राजपूत कांचन गादीकर, रेणुका घुले, संतोष बैनाडे, घनश्याम जोनवाल, संतोष राजपूत यांच्यासह अनेक समाज बांधव उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी महाराणा प्रताप शौर्य व स्वाभिमानाच्या विचारांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले.



# मोबाईल हाती आला अन् मेंदू गुलाम झाला!

विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या झपाट्याने होणाऱ्या प्रगतीमुळे आज मोबाईल फोन प्रत्येकाच्या हातात पोहोचला आहे. काही वर्षांपूर्वी केवळ संवादासाठी वापरला जाणारा मोबाईल आज शिक्षण, व्यवसाय, बँकिंग, मनोरंजन, माहिती, खरेदी आणि सामाजिक संबंध यांचे केंद्र बनला आहे. एका छोट्याशा उपकरणाने जग जवळ आणले, माहिती सहज उपलब्ध करून दिली आणि जीवन अधिक गतिमान केले. परंतु ज्या मोबाईलने माणसाचे जीवन सुलभ केले, त्याच मोबाईलने आता माणसाच्या विचारशक्तीवर आणि मानसिक स्वातंत्र्यावर नियंत्रण मिळवण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळेच ङ्गमोबाईल हाती आला अनब मेंदू गुलाम झालाङ्ख ही भावना आज वास्तव वाटू लागली आहे.

**मोबाईलचे वाढते आकर्षण–** आज लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत प्रत्येकाच्या हातात स्मार्टफोन दिसतो. सकाळी डोळे उघडल्यावर पहिली नजर मोबाईलकडे जाते आणि रात्री झोपण्यापूर्वी शेवटचा स्पर्शही मोबाईललाच होतो. सोशल मीडिया, व्हिडिओ, गेम्स, रील्स, ऑनलाइन चॅट आणि सतत येणाऱ्या नोटिफिकेशन्समुळे माणूस मोबाईलच्या जगात इतका रमून जात आहे की वास्तव जीवनापासून दूर जाऊ लागला आहे. मोबाईलमुळे माहिती मिळवणे सोपे झाले आहे, पण त्याचबरोबर माहितीचा अतिरेकही वाढला आहे. माणूस सतत स्क्रीनसमोर राहू लागल्याने त्याच्या विचार करण्याच्या सवयीमध्ये बदल झाला आहे. प्रत्येक गोष्टीसाठी गुगलवर अवलंबून राहण्याची प्रवृत्ती वाढली आहे. स्वतः विचार करण्याऐवजी तयार उत्तरांवर समाधान मानले जात आहे.

**सोशल मीडियाचे व्यसन –** मोबाईलच्या माध्यमातून सोशल मीडियाचा प्रभाव प्रचंड वाढला आहे. फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॉट्सअॅप, युट्यूब आणि इतर अनेक प्लॅटफफॉर्म माणसाचा मोठा वेळ घेत आहेत. काही क्षण मनोरंजनासाठी मोबाईल हातात घेतलेला माणूस अनेकदा तासन्तास त्याच स्क्रीनमध्ये अडकून राहतो. रील्स आणि लहान व्हिडिओंच्या सतत बदलणाऱ्या दृश्यांमुळे मेंदूला क्षणिक आनंद मिळतो, पण एकाग्रता कमी होत जाते. विशेषतः तरुण पिढी सोशल मीडियाच्या आहारी जात असल्याचे चित्र दिसते. इतरांचे दिखाऊ जीवन पाहून स्वतःबद्दल न्यूनगंड निर्माण होतो. लाइक्स, फॉलोअर्स आणि कमेंट्स यामध्येच आत्म विश्वास मोजला जाऊ लागतो. त्यामुळे मानसिक ताण, असुरक्षितता आणि नैराश्य वाढण्याचा धोका निर्माण झाला आहे.



– डॉ. सुवर्णा कराड,
महिला आघाडी,
महाराष्ट्र राज्य.

**संवाद वाढला, पण नाती कमी झाली –** मोबाईलमुळे संवाद साधणे अत्यंत सोपे झाले आहे. एका क्लिकवर जगातील कोणाशीही संपर्क साधता येतो. मात्र, प्रत्यक्ष संवाद कमी होत चालला आहे. कुटुंबातील सदस्य एकाच घरात असले तरी प्रत्येक जण स्वतःच्या मोबाईलमध्ये व्यस्त दिसतो. जेवताना, प्रवासात किंवा मित्रांमध्ये बसतानाही मोबाईलचे आकर्षण सुटत नाही. पूर्वी लोक प्रत्यक्ष भेटून बोलत होते, अनुभव शेअर करत होते आणि नाती अधिक घट्ट होत होती. आज मात्र ऑनलाइन उपस्थिती वाढली, पण भावनिक जवळीक कमी झाली आहे. मोबाईलमुळे माणूस समाजाशी जोडला गेला असला, तरी स्वतःच्या माणसांपासून दूर गेला आहे.

**विद्यार्थ्यांवर होणारा परिणाम–** मोबाईलचा सर्वाधिक परिणाम विद्यार्थ्यांवर होत आहे. ऑनलाइन शिक्षणामुळे मोबाईलची गरज वाढली, पण त्याचबरोबर अभ्यासापेक्षा मनोरंजनाकडे ओढ अधिक वाढली आहे. सतत नोटिफिकेशन्स पाहण्याची सवय, गेम्स आणि सोशल मीडियामध्ये वेळ घालवण्यामुळे अभ्यासात एकाग्रता राहत नाही. वाचनाची सवय कमी होत आहे. पुस्तकांपेक्षा स्क्रीन अधिक आकर्षक वाटू लागली आहे. अनेक विद्यार्थ्यांना दीर्घकाळ अभ्यास करण्याची क्षमता कमी होत असल्याचे दिसते. मोबाईलच्या अतिरेकामुळे झोपेचे विकार, डोळ्यांचे त्रास आणि मानसिक अस्थिरता वाढत आहे.

**मानसिक आणि शारीरिक परिणाम–** मोबाईलचा अतिरेक केवळ मानसिकच नव्हे तर शारीरिक आरोग्यावरही परिणाम करतो. सतत स्क्रीनकडे पाहिल्यामुळे डोळ्यांवर ताण येतो, मान आणि पाठीचे विकार निर्माण होतात. झोपण्यापूर्वी मोबाईल वापरल्यामुळे झोपेची गुणवत्ता कमी होते. अनेक लोक मोबाईलशिवाय काही मिनिटेही राहू शकत नाहीत. हीच स्थिती व्यसनाकडे नेणारी ठरते. मानसिकदृष्ट्या माणूस चिडचिडा, अस्वस्थ आणि एकलकोंडा होत चालला आहे. सोशल मीडियावरील सततच्या तुलना आणि आभासी जगातील स्पर्धेमुळे मानसिक शांतता हरवत आहे. माणूस माहितीने समृद्ध होत असला, तरी मनाने कमकुवत होत आहे.

**तंत्रज्ञानाचा योग्य वापर आवश्यक –** मोबाईल हे तंत्रज्ञानाचे अत्यंत उपयुक्त साधन आहे. त्याचा वापर शिक्षण, व्यवसाय, आरोग्य, प्रशासन आणि सामाजिक विकासासाठी प्रभावीपणे होऊ शकतो. समस्या मोबाईल मध्ये नाही, तर त्याच्या अतिरेकात आहे. तंत्रज्ञान माणसाच्या नियंत्रणात असावे; माणूस तंत्रज्ञानाच्या नियंत्रणात नसावा.

मोबाईल वापरण्यासाठी वेळेचे नियोजन आवश्यक आहे. कुटुंबासोबत वेळ घालवणे, पुस्तक वाचन, मैदानी खेळ, प्रत्यक्ष संवाद आणि निसर्गाशी मैत्री यांना महत्त्व दिले पाहिजे. मुलांमध्ये मोबाईल वापराबाबत योग्य संस्कार करणेही तितकेच गरजेचे आहे. एकूणच, मोबाईलने माणसाचे जीवन बदलले, पण त्याचवेळी जीवनशैली आणि विचारसरणीवरही खोल परिणाम केला आहे.

मोबाईलमुळे जग जवळ आले, पण माणूस स्वतःपासून दूर गेला. माहिती वाढली, पण विचार कमी झाले; संवाद वाढला, पण नाती कमी झाली. म्हणूनच मोबाईलचा वापर आवश्यक असला, तरी त्याचे गुलाम होणे धोकादायक आहे. आज प्रत्येकाने स्वतःला एक प्रश्न विचारण्याची गरज आहे. मी मोबाईल वापरत आहे की मोबाईल मला वापरत आहे? कारण मोबाईल आपल्या हातात असावा; आपल्या मेंदूवर त्याचा ताबा नसावा.

# आधुनिक नर्सिंगच्या फाऊंडर: लेडी फ्लोरेन्स नाईटिंगल!

फ्लोरेन्स नाईटिंगल या धनाढ्य कुटुंबातून आल्या होत्या. तरीही त्यांनी आपले सर्व जीवन रुग्णसेवेला अर्पण करण्याचा निर्णय घेतला. अनेक आधुनिक सुश्रुषा पद्धती त्यांनी विकसित केल्या. लंडनमध्ये त्यांनी केलेल्या रुग्णसेवेमुळे सैनिकांचा मृत्यू दरही ६९ टक्क्यांवरून १८ टक्क्यांवर आला होता. त्या रात्री रात्री जागून तासनब तास रुग्णांची सेवा करत असत. रात्री हातात लँप– कंदील घेऊन प्रत्येक रुग्णाची काळजी घेत असत. त्यामुळे त्यांना लॅम्प लेडी असेही म्हटले जात असे. रोचक माहितीपूर्ण असा श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरूजींचा सदर संकलित लेख... संपादक.



चीनच्या वुहान शहरापासून वाढत गेलेल्या कोरोना विषाणूच्या प्राणघातक संसर्गाने जगभर धुमाकूळ घातला होता. भारतातही कोरोना बाधितांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली होती. कोरोनाच्या मोठ्या लढ्यात डॉक्टर, परिचारिका, पोलीस, शिक्षक हे दोन वर्षांपर्यंत चोख भूमिका बजावत होते. जागतिक स्तरावर मातृदिन, पितृदिन आणि आणखी काही दिवस साजरे केले जातात. तसेच रुग्णांची सेवा करणाऱ्या परिचारिकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी १२ मे हा दिवस आंतरराष्ट्रीय किंवा जागतिक परिचारिका दिन म्हणून साजरा केला जातो. सन १९७१मध्ये आंतराष्ट्रीय परिचारिका परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. आधुनिक नर्सिंगच्या फाऊंडर लेडी फ्लोरेन्स नाईटिंगल यांचा जन्म ज्या तारखेला झाला, तो दिवस जागतिक परिचारिका दिवस म्हणून घोषित करण्यात आला. तेव्हापासून अख्ख्या विश्वाच्या पाठीवर १२ मे हा दिवस जागतिक परिचारिका दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. फ्लोरेन्स नाईटिंगल या धनाढ्य कुटुंबातून आल्या होत्या. तरीही त्यांनी आपले सर्व जीवन रुग्णसेवेला अर्पण करण्याचा निर्णय घेतला. अनेक आधुनिक सुश्रुषा पद्धती त्यांनी विकसित केल्या. लंडनमध्ये त्यांनी केलेल्या रुग्णसेवेमुळे सैनिकांचा मृत्यू दरही ६९ टक्क्यांवरून १८ टक्क्यांवर आला होता. त्या रात्री रात्री जागून तासनतास रुग्णांची सेवा करत असत. रात्री हातात लँप– कंदील घेऊन प्रत्येक रुग्णाची काळजी घेत असत. त्यामुळे त्यांना लॅम्प लेडी असेही म्हटले जात असे. थोडक्यात त्यांची माहिती– फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांचा जन्म १२ मे १८२० रोजी झाला. त्या अग्रगण्य परिचारिका, लेखक व संख्याशास्त्रज्ञ होत्या. इ.स.१८५३ साली झालेल्या क्राइमियन युद्धादरम्यान जखमी सैनिकांची सुश्रुषा केल्याबद्दल त्यांना प्रसिद्धी मिळाली. त्यांना लेडी विथ द लॅम्प असेही म्हणत. अतिशय सुखवस्तू घराण्यात जन्म होऊनही परमेश्वराने आपल्याला भूतदयेसाठी व मानवतेची सेवा करण्यासाठीच जन्माला घातले, या भावनेने त्या प्रेरित झाल्या होत्या. रेडक्रॉसचे संस्थापक हेन्री ड्युनेन्ट यांनी त्यांना लेडी विथ द लॅम्प ही उपाधी दिली. त्यांच्या हातातील कौशल्य व वैज्ञानिक दृष्टिकोनातून रूग्णसेवा केल्यामुळेच परिचर्याशास्त्राला नवीन दिशा प्राप्त झाली. त्यांच्या सन्मानाप्रित्यर्थ १२ मे हा त्यांचा जन्मदिवस जगभराम ध्ये जागतिक परिचर्यादिन म्हणून साजरा केला जातो. फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांना बालपणापासूनच गणितात गती होती. आकडेवारी आलेखांच्या माध्यमातून दृश्य सादरीकरण करणे, हे त्याकाळात फारसे प्रचलित नव्हते. विल्यम प्लेफेअर यांनी विकसित केलेल्या पाय आकृतीसारख्या आलेखांचा त्यांनी परिणामकारकरित्या वापर केला. नाइटिंगेल यांचे संख्या शास्त्रातील सर्वात म हत्त्वपूर्ण योगदान म्हणजे त्यांनी विकसित केलेली ध्रुवीय क्षेत्र आकृती होय. या प्रकारच्या आलेखास नाइटिंगेल रोझ प्लँट असेही म्हटले जाते. स्वतः काम करीत असलेल्या लष्करी रुग्णालयातील दर महिन्यातील मृत्यूंची संख्या व कारणे यांचे सादरीकरण करण्यासाठी त्यांनी या आकृतीचा वापर केला.




– संकलन व शब्दांकन –
**श्री निकोडे कृष्णकुमार आनंदी-गोविंदा.**
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.

एरवी आकडेवारीच्या जंजाळामुळे संसद सदस्य आणि सरकारी अधिकारी यांच्याकडून असे अहवाल दुर्लक्षित राहात असत. परंतु नाइटिंगेल यांनी केलेल्या प्रभावशाली दृश्य सादरीकरणामुळे सैनिकांसाठीच्या वैद्यकीय सुविधा किती अपुऱ्या आहेत? याची जाणीव होऊन या वैद्यकीय सुविधांचा दर्जा सुधारण्याचे प्रयत्न सुरू झाले. या सर्व कामामुळे रॉयल स्टॅटिस्टिकल सोसायटीच्या पहिल्या महिला सभासद होण्याचा सन्मान सन १८५९ साली नाइटिंगेल यांना प्राप्त झाला. पुढे अमेरिकन स्टॅटिस्टिकल असोसिएशनने देखील त्यांना सन्माननीय सदस्यत्व बहाल केले गेले. त्यांचे दि.१३ ऑगस्ट १९१० रोजी दुःखद निधन झाले.

परिचारिकांना आजही अनेक समस्या भेडसावत आहेत. तरीही त्या रुग्णसेवेला प्राधान्यक्रम देत त्या रुग्णांची सेवा करीत असतात. हजारो परिचारिका वैद्यकीय क्षेत्रात सक्रिय कार्यरत आहेत. मध्यंतरी म ुंबईच्या महापौर किशोरी पेडणेकर यांनीही परिचारिकेचा गणवेश परिधान करून नायर रुग्णालयाला भेट दिली होती. किशोरी पेडणेकर यांनी काही वर्षांपूर्वी नायर रुग्णालयात परिचारिका म्हणून आपली सेवा बजावली होती. कोविड युद्धात स्वतः उतरून त्यांनी एकप्रकारे परिचारिकांना मानवंदना दिल्याचे सांगितले जाते. कोणत्याही रुग्णालयातील रुग्ण हा डॉक्टरांपेक्षा अधिक काळ परिचारिकेच्या देखरेखीखाली असतो. रुग्णालयात दाखल झालेल्या रुग्णांची त्या अहोरात्र सेवा करीत असतात. रुग्णाला सकारात्मकता प्रदान करणे व त्यांना आनंद देणे हे महत्त्वाचे कार्य त्या करीत असतात. आताच्या घडीलाही कोरोनासारख्या महाभयंकर व जीवघेण्या संकटकाळात त्यांची भूमिका महत्त्वाची ठरली. कुटुंबांची, मुलांची, प्रसंगी आपल्या जीवाची पर्वा न करता दिवस–रात्र झटून त्या आपली सेवा अत्यंत चोखपणे बजावत असत. अनेक रुग्णालयातील परिचारिका तर गेले कित्येक दिवस आपल्या घरीदेखील गेल्या नाहीत. वैद्यकीय क्षेत्रात त्यांचे योगदान अमूल्य असेच आहे. त्यांच्याशिवाय वैद्यकीय क्षेत्र पूर्णत्वास जाऊ शकत नाही. वैद्यकीय क्षेत्रातील रुग्णसेवेत प्रमुख भूमि का बजावणाऱ्या परिचारिकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी जागतिक परिचारिका दिन साजरा केला जातो. कोरोना संकटकाळात त्या खऱ्या योद्धा बनून अहोरात्र रुग्णसेवा करत राहिल्या. त्यांच्या कार्याला माझा या शब्दप्रपंचाने सलाम!

!! रुग्णसेवेत सर्वस्व पणाला लावणाऱ्या जगातील समस्त सिस्टर्सना कोटी कोटी सॅल्यूट !!

# भांगशी माता गडावर 'श्री शिवशंभू प्रतिष्ठाण'ची भव्य स्वच्छता मोहीम



**छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)**

'श्री शिवशंभू प्रतिष्ठाण'च्या वतीने रविवारी (१० मे) भांगशीमाता गड, छत्रपती संभाजीनगर येथे भव्य स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत ७० पेक्षा जास्त शिवप्रेमींनी उत्स्फूर्त सहभाग घेत गडावरील संपूर्ण परिसर चकाचक केला.

मोहिमेची सुरुवात छत्रपती श्री शिवाजी म हाराज आणि वीर शिरोमणी महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेचे पूजन करून व 'शिववंदना' घेऊन करण्यात आली. यावेळी सर्व शिवप्रेमींनी 'आम्ही गडाला मोकळा श्वास घेण्यास सदैव तत्पर असू' अशी शपथ घेतली. स्वयंसेवकांनी गडाचा कानाकोपरा पिंजून काढत प्लास्टिकच्या पाण्याच्या बाटल्या, चिप्सची पाकिटे, प्रसादाच्या कॅरीबॅग आणि मावा–गुटख्याच्या पुड्या असा तब्बल ५ फूट उंचीच्या १६ मोठ्या डस्टबिन बॅग्स भरून कचरा गोळा केला व त्याची योग्य विल्हेवाट लावली.

या यशस्वी मोहिमेत संस्थेचे अध्यक्ष श्री. लक्ष्मण सातपुते यांच्यासह दत्तात्रय बोरुडे, शुभम चव्हाण, चेतन सोनावणे, शुभम मोटे, प्रमोद पठाडे, उमेश वाघ, योगेश थोरे, अमोल पेनोरे, पूजा राजपूत, सुनील करके, मारोती लोणे, अनंत ढोरे, आकाश मेटे, शिवप्रसाद सुस्ते, समाधान घोडके आणि इतर ७० शिवप्रेमींनी अथक परिश्रम घेऊन गडाची पूर्ण स्वच्छता केली.

**दरमहा एका गडावर स्वच्छता मोहीम आणि शिवप्रेमींना साद**

'श्री शिवशंभू प्रतिष्ठाण' च्या वतीने केवळ एकाच गडावर न थांबता, दर महिन्याला एका नवीन गडावर जाऊन अशीच भव्य स्वच्छता मोहीम राबवली जाते. किल्ल्यांचे पावित्र्य आणि ऐतिहासिक वारसा जपणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. संस्थेच्या या गड–दुर्ग संवर्धन मोहिमेचा आणि इतर सर्व सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक उपक्रमांचा सविस्तर आराखडा www.misanatan.com या अधिकृत वेबसाईटवर उपलब्ध आहे. गडांना मोकळा श्वास देण्यासाठी आणि या राष्ट्र व धर्म कार्यात खारीचा वाटा उचलण्यासाठी अधिकाधिक तरुणांनी आणि शिवप्रेमींनी प्रतिष्ठाणसोबत जोडले जावे व आगामी मोहिमांमध्ये प्रत्यक्ष सहभागी व्हावे, असे जाहीर आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

# आय लव्ह एक्झाम उपक्रमातून विद्यार्थ्यांना परीक्षेत मिळाली प्रेरणा



**छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)**

दहावीच्या परीक्षेपूर्वी विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करून तणावमुक्त वातावरणात अभ्यास करण्यासाठी राबविण्यात आलेल्या आय लव्ह एक्झाम या प्रेरणादायी उपक्रमाचा सकारात्मक परिणाम एसएससी बोर्ड निकाल २०२६ मध्ये पाहायला मिळाला. युवा आयकॉन निखिल काकडे यांच्या पुढाकारातून युवा सेना कॉलेज कक्षा मराठवाडा अंतर्गत आयोजित या उपक्रम ातील अनेक विद्यार्थ्यांनी परीक्षेत उल्लेखनीय गुण मिळवत यश संपादन केले.

परीक्षेपूर्वी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात अनुभवी प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना स्मार्ट अभ्यास पद्धती, वेळेचे नियोजन, आत्मविश्वास वाढविणे तसेच तणावमुक्त परीक्षा तयारी याबाबत मार्गदर्शन केले होते. विद्यार्थ्यांच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी सराव परीक्षा देखील घेण्यात आल्या होत्या. या मार्गदर्शनाचा विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष परीक्षेत मोठा लाभ झाल्याची भावना पालक व विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. आय लव्ह एक्झाम उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक दृष्टीकोन निर्माण झाला असून भीतीऐवजी आत्मविश्वासाने परीक्षांना सामोरे जाण्याची मानसिकता तयार झाली. यंदाच्या निकालात विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशामुळे या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# अखिल भारतीय औषध विक्रेत्यांचा दि.२० मे २०२६ रोजी देशव्यापी बंद



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

अखिल भारतीय औषध विक्रेता संघटनेने (AIOCD) बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्री तसेच कंपन्यांद्वारे अव्यावसायिक स्पर्धे विरोधात दि. २० मे २०२६ रोजी औषध विक्रेत्यांचा बंद पुकारला आहे.

औषधी व्यवसाय हा Drugs and Cosmetics Act 1940 व Rule 1945 अंतर्गत चालवला जातो. ऑनलाईन औषध विक्रीबाबत Drugs and Cosmetics Act मध्ये कोणतीही तरतूद नाही. केंद्र सरकारने इंटरनेटच्या माध्यमातून ऑनलाईन औषध विक्रीबाबत GSR 817(E) दि. 28.08.2018 अंतर्गत नोटिफिकेशन जारी केले होते. परंतु त्याचे अध्यादेश कायद्यात रूपांतर झालेले नसल्यामुळे देशभरात सर्वच प्रकारची बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्री सुरू आहे. याबाबत मा. दिल्ली उच्च न्यायालयात रिट पिटीशन दाखल असून मा. दिल्ली उच्च न्यायालयाने ऑनलाईन औषध विक्रीवर स्थगिती देण्याचे निर्देश दिले आहेत. याकडेही सरकार दुर्लक्ष करीत आहे.

संघटनेने सदरचे जीएसआर रद्द करण्याची मागणी केली आहे.अशी माहिती आज पत्रकार परिषदेमध्ये दि औरंगाबाद केमिस्ट अंड ड्रगिस्ट संघटनेचे अध्यक्ष श्री. नितिन हरिश्चंद्र देशमुख(दांडगे), सचिव विनोद रुपचंद लोहाडे, उपाध्यक्ष शहर श्री.नंदकिशोर सर्जेराव काळे, सह-सचिव शहर श्री. किरण विठ्ठलराव जोशी, सह-सचिव ग्रामीण श्री.सुनील प्रभाकरराव देशमुख यानी दिली

कोरोना काळात GSR 220(E) दि. २६.०३.२०२० नुसार सरकारने औषधांची होम डिलिव्हरी देण्याबाबत विशेष सूट दिली होती. कोरोना संपून पाच वर्षे उलटल्यानंतरही सदरचे नोटिफिकेशन कायमस्वरूपी रद्द करण्यात आलेले नाही. याचा गैरफायदा घेऊन ऑनलाईन कंपन्या स्वतःचे भांडार उभारून औषध विक्रीचा व्यवसाय करीत आहेत तसेच कंपन्यांकडून अव्यावसायिक स्पर्धा निर्माण केली जात आहे. त्यामुळे अनेक छोटे व्यावसायिक अडचणीत येत असून ग्रामीण भागातील औषधी वितरण व्यवस्था धोक्यात येऊ शकते.

जगन्नाथ शिंदे पुढे म्हणाले की, सरकारने Drug Price Control Order (DPCO) 2013 या कायद्यानुसार चरर्पीषरर्लींशी कडून काही जीवनावश्यक औषधीवर ८% होलसेलरला व १६% रिटेलरला व अनियंत्रित औषधीवर १०% होलसेलर व २०% रिटेलरला नफा देण्यात येतो. याउलट कंपन्या आपल्या भागभांडवल वाढवण्यासाठी २०% ते ४०% डिस्काउंट देतात. त्यामुळे संपूर्ण देशातील १२.५० लाख औषध विक्रेत्यांचा व्यवसाय धोक्यात येऊन बंद होण्याच्या मार्गावर आहे. यामुळे सरकारने Drug Price Control जीवशी (DPCO) 2013 अंतर्गत 16% नफा नियंत्रित केलेला नफा व्यवसायात टिकवून ठेवण्यासाठी तसेच औषध विक्रेत्यांना डॉक्टरांच्या औषधांऐवजी अन्य Brand substitute औषधी देण्याचा अधिकार दिल्यास औषध विक्रेते ही स्पर्धेला उत्तर देऊ शकणाऱ्या कंपन्यांसोबत लढा देऊ शकतील.

एआयओसीडीचे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांनी स्पष्ट केले आहे की, केंद्र शासनाने संबंधित विभागाचे मंत्री तसेच संबंधित प्रशासकीय अधिकारी यांना वारंवार निवेदने देऊन तसेच प्रत्यक्ष भेटीसाठी वेळ मागूनही सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले. त्यानंतर संघटनेने मा. श्री. नरेंद्रजी मोदी - पंतप्रधान यांनाही निवेदन देऊन याकडे लक्ष देण्याची विनंती केली. त्यासही प्रतिसाद न मिळाल्यामुळे संघटनेने आंदोलनात्मक भूमिका घेतली व त्याअंतर्गत झालेल्या निर्णयानुसार दि. २० मे २०२६ रोजी अखिल भारतीय औषध विक्रेत्यांचा बंद पुकारण्यात आला आहे.

राज्यसंघटनेचे सचिव अनिल गावंडे यांच्यासह छत्रपती सभाजीनगरचे श्री.नितिन हरिश्चंद्र देशमुख (दांडगे), श्री. विनोदकुमार रुपचंद लोहाडे, श्री.निखील सुनील सारडा, श्री.नंदकिशोर सर्जेराव काळे, श्री. सागर साहेबराव पाटील, श्री. किरण विठ्ठलराव जोशी, श्री.सुनील प्रभाकरराव देशमुख, श्री. बाबुराव धोंडीबा सोनवणे, श्री. कपिल राजकुमार टिबडीवाला, श्री.शेख अब्दुल रईस अब्दुल वहाब, वसंत नारायण भराड, श्री. हरीष भगवान काबरा, श्री.सचिन सुरेशकुमार मुगदिया, श्री.प्रभू कचरू गिरी, श्री. सुरेश प्रभाकर बोरसे, श्री.अशोक बाबासाहेब धस, श्री. प्रवीण कमलकिशोर तिवारी, देवीदास मुरलीधर मगर. सर्व कार्यकारिणी तसेच मराठवाडा झोन चे अध्यक्ष श्री. सय्यद इजान व महाराष्ट्र राज्य फार्मसी कौन्सिल चे सदस्य श्री. मनोहर कोरे यांनी सदरचे बंद महाराष्ट्र राज्यात १००% यशस्वी होईल यासाठी संपूर्ण समाजबांधव 'बंदच्या' मानसिकतेत असल्याचे स्पष्ट केले. ते पुढे असेही म्हणाले की, लोकशाही मार्गाने केलेल्या प्रयत्नांना सरकारकडून योग्य व सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्यामुळे सभासदांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला आहे. राज्यसंघटनेचे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांनी स्पष्ट केले की, सरकारने आमच्या मागण्यांवर न्याय भूमिका न घेतल्यास आंदोलनाच्या पुढील टप्प्यात होणाऱ्या गैरसोयींना संपूर्णपणे सरकार जबाबदार राहील.

# उपवास हा आत्मशुद्धी आणि संयमाचा महापर्व- अंतर्मना आचार्य प्रसन्न सागर महाराज

## 'दर महिन्याला एक उपवास' महाअभियानात तप-संयमाचा संकल्प

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

परतापूर, नगरातील नेमिनाथ दिगंबर जैन मंदिरात विराजमान असलेल्या अहिंसा संस्कार पदयात्रेचे प्रणेते, अंतर्मना आचार्य प्रसन्न सागर महाराज ससंघ यांच्या सान्निध्यात सुभाषचंद्र बोस स्टेडियममध्ये 'दर महिन्याला एक उपवास' महाअभियान आणि जैन मंगल महोत्सवाचा भव्य कार्यक्रम श्रद्धा, भक्ती आणि आध्यात्मिक उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमात हजारो श्रद्धाळूंची अभूतपूर्व उपस्थिती लाभली आणि संपूर्ण परिसर धर्ममय झाला.



विशाल धर्मसभेत आचार्यश्रींच्या ओजस्वी आणि प्रेरणादायी प्रवचनांनी प्रभावित होऊन शेकडो श्रद्धाळूंनी दर महिन्याला एक उपवास करण्याचा संकल्प स्वीकारला. संपूर्ण स्टेडियम नवकार महामंत्र, जयघोष आणि धर्मजयकारांनी दुमदुमून गेले.

आचार्यश्री म्हणाले की, उपवास हा केवळ अन्नत्याग नसून आत्म्याची शुद्धी, मनाची पवित्रता आणि संयमाचा महोत्सव आहे. आजचा मानव भौतिक सुखांच्या मागे धावताना मानसिक अशांततेने ग्रासला जात आहे, तर तप, त्याग आणि साधना यांमुळेच जीवनात खरी शांती आणि आत्मिक आनंद प्राप्त होतो. प्रत्येक व्यक्तीने महिन्यातील फक्त एक दिवस जरी धर्म आणि तपासाठी समर्पित केला, तरी समाज आणि कुटुंबात सकारात्मक परिवर्तन निश्चित घडेल. कार्यक्रमांतर्गत जनमंगल महोत्सव, मंत्रस्नान आणि जलयज्ञ यांसारख्या धार्मिक विधींचे आयोजन विश्वशांती, मानवकल्याण आणि जनमंगलाच्या भावनेतून करण्यात आले. श्रद्धाळूंनी अत्यंत श्रद्धा आणि भक्तिभावाने या विधींमध्ये सहभाग घेतला.

प्रवक्ते राहुल जैन यांनी सांगितले की, अंतर्मना आचार्य प्रसन्न सागर महाराज यांच्या आवाहनानुसार 'दर महिन्याला एक उपवास' महाअभियान प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेला आयोजित केले जाते. या अभियानाशी देश-विदेशातील सुमारे १२ कोटी लोक जोडले गेले आहेत. हे अभियान केवळ धार्मिक कार्यक्रम नसून आत्मशुद्धी, संयम आणि संस्कार जागृतीचे जागतिक आंदोलन बनले आहे.

कार्यक्रमात हीलिंग कल्पवृक्ष हीलिंग फाउंडेशनच्या प्रियंका दीदी शाह यांनी आध्यात्मिक हीलिंग सत्र घेतले, ज्यामुळे उपस्थित श्रद्धाळूंना विशेष आध्यात्मिक अनुभूती मिळाली. दिशी जैन यांच्या मधुर संगीताने संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले.

कार्यक्रमाचे संचालन नेमिनाथ नवयुवक मंडळाचे अध्यक्ष चिराग दोसी यांनी केले. महिला, युवक आणि मुलांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळाला. मोठ्या संख्येने श्रद्धाळूंनी धर्मप्रभावनेचे हे महाअभियान घराघरांत पोहोचवण्याचा तसेच समाजात तप, त्याग आणि संस्कारांची ज्योत प्रज्वलित ठेवण्याचा संकल्प केला. संपूर्ण कार्यक्रमस्थळ आकर्षक फुले, धार्मिक ध्वज आणि भव्य सजावटीने सजविण्यात आले होते. शिस्त, श्रद्धा आणि भक्तीचा अद्भुत संगम संपूर्ण कार्यक्रमात अनुभवायला मिळाला. शेवटी मंगल आरती, धर्मलाभ आणि आचार्यश्रींच्या मंगल आशीर्वादाने कार्यक्रमाची सांगता झाली. ही माहिती प्रचार-प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा, पियुष कासलीवाल, छत्रपती संभाजीनगर रोमिल पाटणी आणि यांनी दिली.

# छत्रपती संभाजीनगरात हनुमान चालीसा सामूहिक वाचनाचा भक्तिमय उपक्रम संपन्न




**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

विश्व हिंदू परिषद आणि श्री राष्ट्रीय राजपूत करणी सेना, महाराष्ट्र प्रदेश यांच्या संयुक्त विद्यमाने रत्नपूर येथील भद्रा मारुती मंदिर परिसरात हनुमान चालीसा सामूहिक वाचन हा धार्मिक उपक्रम मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने पार पडला. या कार्यक्रमात परिसरातील भाविक, युवक, महिला तसेच विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक पद्धतीने आरती करून करण्यात आली. त्यानंतर उपस्थित सर्व भक्तांनी एकत्रितपणे हनुमान चालीसाचे सामूहिक पठण केले. सामूहिक वाचनामुळे मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

**धार्मिक एकात्मता आणि संस्कृती जतनाचा संदेश** – या उपक्रमामागील मुख्य उद्देश समाजात धार्मिक एकात्मता वाढवणे, भारतीय संस्कृती आणि परंपरांचे जतन करणे तसेच तरुण पिढीला आपल्या धार्मिक आणि सांस्कृतिक मूल्यांशी जोडणे हा असल्याचे आयोजकांनी सांगितले. कार्यक्रमादरम्यान ह.भ.त. अभयानंदगिरी महाराज (कैलास आश्रम, वेरूळ), नवचैतन्य गिरी महाराज तसेच जहागीरदार सर यांनी उपस्थितांना हिंदू संस्कृती जनजागृती, सामाजिक बांधिलकी आणि धर्मरक्षणाच्या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांच्या विचारांनी उपस्थितांमध्ये उत्साह आणि प्रेरणा निर्माण झाली.

**डॉ. जीवन राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन** – या धार्मिक उपक्रमाचे आयोजन आणि संपूर्ण समन्वय डॉ. जीवन राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी स्थानिक कार्यकर्ते आणि स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

**प्रत्येक मंगळवार आणि शनिवारी उपक्रम राबविण्याचा संकल्प**– या कार्यक्रमाच्या यशानंतर पुढील काळात प्रत्येक मंगळवार आणि शनिवार रोजी गाव, तालुका आणि शहर पातळीवर नियमितपणे हनुमान चालीसा सामूहिक वाचन उपक्रम राबविण्याचा संकल्प करण्यात आला आहे. आयोजकांच्या मते, अशा धार्मिक आणि सांस्कृतिक उपक्रमांमुळे समाजामध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण होऊन सामाजिक ऐक्य अधिक मजबूत होण्यास मदत होणार आहे.



# पोलीस पाटलांसाठी नळविहिरा येथे सुसंवाद कार्यक्रम उत्साहात संपन्न

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**



सत्कर्मी स्व. दमोतराव दौलतराव पाटील मोरे ( माजी पोलीस पाटील ) यांच्या स्मरणार्थ पाटील कृषी फार्म, अ‍ॅग्रोव्हिजन गटशेती संघ व नल अ‍ॅग्रोव्हिजन फार्मर प्रोड्युसर कंपनी लि. यांच्या संयुक्त विद्यमाने पोलीस पाटलांसाठी आयोजित सुसंवाद कार्यक्रम सोमवारी ( दि. ४ मे ) नळविहिरा येथील दमयंती नगरीच्या पाटील कृषी फार्मवरील पाटील स्मृती येथे अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

टेंभुर्णी पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या सर्व आजी व माजी पोलीस पाटील यांच्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास पोलीस पाटलांसह परिसरातील मान्यवरांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात स्व. दमोतराव पाटील मोरे यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन करून करण्यात आली. उपस्थितांनी त्यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या समाजसेवेच्या आठवणींना उजाळा दिला.

या सुसंवाद कार्यक्रमामध्ये पोलीस पाटील यांच्यातील अनुभवांची देवाण-घेवाण झाली. ग्रामीण भागातील कायदा व सुव्यवस्था राखताना येणाऱ्या अडचणी, त्यावरील उपाययोजना तसेच प्रशासन व गावपातळीवरील समन्वय या विषयांवर सकारात्मक चर्चा करण्यात आली. या चर्चेमुळे उपस्थित नवीन पोलीस पाटलांना सेवानिवृत्त पोलीस पाटलांकडून मौलिक मार्गदर्शन मिळाले. कार्यक्रमात सर्व आजी व माजी पोलीस पाटील यांचा सन्मान करण्यात आला. यानंतर सर्व उपस्थित व गावकऱ्यांनी वनभोजनाचा आनंद घेतला. या प्रसंगी मैत्रीपूर्ण वातावरणात पोलीस पाटलांनी एकमेकांशी सुसंवाद साधला. कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत नियोजनबद्ध व शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले होते. यासाठी आयोजकांनी घेतलेले परिश्रम कौतुकास्पद ठरले. कार्यक्रमाचे प्रमुख संयोजक तथा अ‍ॅग्रोव्हिजन गटशेती संघाचे संस्थापक प्रमुख संजय मोरे पाटील यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व भविष्यातही अशा उपक्रमांचे आयोजन करण्याचा मानस व्यक्त केला. पोलीस पाटलांच्या कार्याचे भान ठेवत अशा प्रकारचा हा कार्यक्रम पहिल्यांदा घडत असून या उपक्रमामुळे पोलीस पाटील यांच्यातील ऐक्य अधिक दृढ होण्यास मदत होणार असून ग्रामीण प्रशासन व्यवस्थेला बळकटी मिळण्यास मदत होईल, अशी भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली. सेवानिवृत्त पोलीस पाटील मधुकर चौधरी (तपोवन गोंधन), उत्तम बोऱ्हाडे (गोंधनखेडा), मोतीराम अंधारे (गणेशपूर) यांच्या मार्गदर्शनाचा उपस्थित पोलीस पाटील शरदचंद्र बनकर (बुटखेडा), कैलास देठे (आंबेगाव), शेख नवाज (ढ्काळेगाव), अन्सार शहा (कुंभारझरी), कैलास जाधव (वरखेडा फिरंगी), लखन हिवाळे (गाडेगव्हाण), श्री. सुनिल ढवळे (गव्हाण संगमेश्वर), कैलास जाधव (नळविहिरा) श्रीमती आरती जाधव (हिवरा काबली ) आदी पोलीस पाटलांनी लाभ घेतला. यावेळी दहिगावचे नंदकिशोर देशमुख, डोलखेडा खुर्दचे भानुदास डोईफोडे, आंबेगावचे दत्तात्रय देठे, अकोला देवचे सुधीर जोशी, दत्तात्रय सवडे यांच्यासह गावकऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# शुक्लेश्वर मंदिर ट्रस्टच्या जमिनीच्या व्यवहारावरून वाद; बेकायदा विक्रीचा आरोप

## रजिस्ट्री कार्यालयातील बोगस अधिकाऱ्यांचा प्रताप

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

रजिस्ट्री कार्यालयातील अधिकारी सहाय्यक दुय्यम निबंधक वर्ग २ चे खुलताबाद येथील अशोक इंगोले यांनी आपल्या शासकीय पदाचा दुरुपयोग करून फाजलपुरा येथील शुक्लेश्वर मंदीर देवस्थान असलेली जमीन बेकायदेशीर दस्त नोंदणी केल्याबद्दल त्यांच्यावर व संबंधीतांवर योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्याबाबत भिम शक्ती शहर जिल्हा अध्यक्ष सतिश जगन्नाथ नरवडे यांनी दि. २६ एप्रिल २०२६ रोजी रोजी तक्रार अर्ज सादर केला होता. त्या अर्जावर कारवाई करत सह.जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी विवेक गांगुर्डे यावर सुनावणी घेवून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

फाजलपुरा जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथील शुक्लेश्वर मंदिर/ देवस्थान सिटी सर्व्हे नं ११४१२/२, ११४११, ११४१२/११ तसेच ११४१२/१२ दिनांक १८/०२/२०२६ रोजी आपल्या कार्यालयात नोंदणीकृत दस्त क्रमांक ५११, ५१२, ५१८, ५१४, ५५, ५१६, ५१७, ५१९ व ५२० या क्रमांकाचे दस्त नोंदणीकृत झालेले आहे यापैकी ५ दस्तऐवज हे भाडेपट्टाचे रद्दपत्र असून ५ दस्तऐवज खरेदीखताचे आहे.

तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, सदर मिळकत ही हिंदू मिळकत श्री शुक्लेश्वर मंदिराची असून लिहून घेणारा मुस्लिम सम ाजाच्या व्यक्तीला विक्री केली असून सदर खरेदीखत हे नियमबाह्य असल्याचे तक्रारीत म्हटले होते. सुनावणी नि:पक्ष व्हावी असे नागरिकांचे म्हणणे आहे.

त्या अनुषंगाने सह.जिल्हा निबंधक वर्ग-१ यांनी तक्रारातील दस्तऐवज आपण कोणत्या नियमाने कायद्याने व शासन राजपत्र अथवा शासन निर्णय / केंद्रशासन राज्य शासनाच्या परवानगीने केलेले आहे याचा विनाविलंब दस्तनिहाय तात्काळ स्वयंस्पष्ट अहवाल सादर करावा. असे खुलताबाद येथील सहाय्यक दुय्यम निबंधक वर्ग २ चे खुलताबाद अशोक इंगोले यांना पत्राव्दारे सूचित करण्यात आले आहे.

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

शहरातील फाजलपुरा परिसरातील ऐतिहासिक शुक्लेश्वर महादेव मंदिर ट्रस्टच्या जमिनीच्या कथित बेकायदा व्यवहारामुळे नवा वाद निर्माण झाला आहे. ट्रस्टच्या नावावर नोंद असलेल्या मालमत्तेतील काही भाग विक्री केल्याचा आरोप होत असून या प्रकरणी ट्रस्ट सदस्य, स्थानिक नागरिक आणि प्रशासन यांच्यात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शुक्लेश्वर महादेव मंदिर ट्रस्टच्या मालकीची जमीन विविध तुकड्यांमध्ये विभागून नोंदणी करण्यात आल्याचा आरोप आहे. संबंधित व्यवहारासाठी धर्मादाय आयुक्तांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक असताना ती घेण्यात आली का, यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे.

**१.७४ कोटींच्या व्यवहाराची चर्चा –** या प्रकरणात संबंधित जमिनीचा व्यवहार सुमारे १ कोटी ७४ लाख रुपयांत झाल्याची चर्चा आहे. जमिनीच्या विक्रीसंदर्भातील कागदपत्रे आणि नोंदणी प्रक्रियेबाबत स्थानिकांनी शंका उपस्थित केली असून संपूर्ण व्यवहाराची चौकशी करण्याची मागणी केली आहे.



स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, मंदिर ट्रस्टच्या नावावर असलेली मालमत्ता ही सार्वजनिक स्वरूपाची असल्याने तिची विक्री किंवा हस्तांतरण करताना कायदेशीर प्रक्रिया पाळणे बंधनकारक आहे.

**धर्मादाय विभाग आणि पोलिसांकडे तक्रारी**

प्रकरण उघडकीस आल्यानंतर काही ट्रस्ट सदस्य व स्थानिक नागरिकांनी धर्मादाय आयुक्त कार्यालय, पोलिस प्रशासन आणि नोंदणी विभागाकडे लेखी तक्रारी केल्या आहेत. व्यवहाराची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तक्रारदारांच्या मते, संबंधित दस्तऐवजांमध्ये मंदिर ट्रस्टचा उल्लेख टाळण्यात आल्याने व्यवहाराबाबत अधिक संशय निर्माण झाला आहे.

**कायदेशीर कारवाईची मागणी –** या प्रकरणात संबंधित जमीन सार्वजनिक न्यासाची असल्यास परवानगीशिवाय केलेला कोणताही व्यवहार बेकायदेशीर ठरू शकतो, असे कायदेतज्ज्ञांचे मत आहे. त्यामुळे या व्यवहाराची सखोल चौकशी करून आवश्यक असल्यास फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी मागणी जोर धरत आहे.

**प्रशासनाची भूमिका महत्त्वाची –** प्रकरण संवेदनशील बनत असल्याने आता प्रशासन, धर्मादाय विभाग आणि नोंदणी कार्यालयाची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. संबंधित व्यवहाराची कागदपत्रे तपासून सत्य समोर आणण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. दरम्यान, या प्रकरणामुळे मंदिर ट्रस्टच्या मालमत्ता व्यवस्थापनावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून आगामी काळात हा विषय अधिक गाजण्याची शक्यता आहे.

## लेखाविषयक प्रशिक्षण

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

विभागाच्या लेखा व कोषागारे संचालनालयांतर्गत विभागीय सहसंचालकामार्फत लिपीक वर्गीय कर्मचाऱ्यांसाठी लेखा लिपीक, पर्यवेक्षकीय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. हे र्प्शिक्षण २० एप्रिल ते १ जुलै या कालावधीत होत असून विभागातील शासकीय कार्यालयांनी आपल्या लेखा कर्मचाऱ्यांना या प्रशिक्षणासाठी पाठवावे असे आवाहन लेखा व कोषागारे विभागाच्या सह संचालक रेहाना अ काझी यांनी केले आहे.

या ५० दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमात लेखा, वित्त व शासनाच्या विविध संगणक प्रणालींचा समावेश असून त्या विषयाची निश्चित केलेला तपशिलवार अभ्यासक्रम विभागातील सर्व कोषागार अधिकारी कार्यालयात उपलब्ध आहे. या प्रशिक्षणासाठी इच्छुक शासकीय कर्मचाऱ्यांना प्रवेश देण्यात येईल.

प्रशिक्षणासाठी शासकीय कर्मचाऱ्यांचे आवेदन पत्र व कार्यालय प्रमुखाचे शिफारस पत्र पाठवावे. तसेच गट क इच्छुक कर्मचारी व नवनियुक्त कर्मचारी यांनाही अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेता येईल. विशिष्ट मोड्युलसाठीही प्रवेश घेण्याची अनुमती देता येईल. तरी छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्व शासकीय कार्यालयीन प्रमुखांना त्यांच्याकडील गट क तसेच लिपीक वर्गीय कर्मचारी यांना प्रशिक्षणासाठी पाठवावे असे आवाहन सहसंचालक रेहाना काझी यांनी केले आहे.

## अशोक खरात प्रकरणात रुपाली चाकणकरांची SIT चौकशी

**नाशिक (अट्टल मत प्रतिनिधी)**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली चाकणकर अखेर नाशिकमध्ये रविवारी विशेष पोलीस पथकाच्या (एसआयटी) चौकशीला सामोऱ्या गेल्या. या चौकशीदरम्यान त्यांनी ट्रस्टमध्ये विश्वस्त म्हणून त्यांची कशी नियुक्ती झाली, तसेच त्यांनी कोणते काम केले याबाबतची माहिती दिली. याचबरोबर अशोक खरात यांच्याशी असलेल्या आर्थिक संबंधांबाबतही त्यांनी माहिती दिल्याचे सांगण्यात येत आहे.

मागील महिन्यात १६ मार्च रोजी भोंदू अशोक खरातच्या घरी नाशिकच्या गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकून त्याला अटक केली होती. त्यानंतर भोंदू अशोक खरात प्रकरणात महिला आयोगाच्या माजी अध्यक्ष आणि राष्ट्रवादीच्या नेत्या रुपाली चाकणकर यांची रविवार १० मे २०२६ रोजी नाशिकमध्ये एसआयटीकडून चौकशी करण्यात आली. सकाळीच चाकणकर एसआयटी चौकशीसाठी पुण्याहून नाशिकमध्ये पोहोचल्या होत्या. त्यानंतर त्यांनी थेट एसआयटी कार्यालयात हजेरी लावली. त्याठिकाणी एसआयटी प्रमुख तेजस्वी सातपुते यांच्याकडून त्यांची कसून चौकशी झाली. या चौकशीदरम्यान रुपाली चाकणकर यांच्यासोबत त्यांचे वकीलही उपस्थित असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे या चौकशीत अशोक खरात प्रकरणात आणखी कोणती नवी माहिती समोर येते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, भोंदू अशोक खरात प्रकरणात आतापर्यंत अनेक धक्कादायक खुलासे झाले असून, पोलिसांनी यापूर्वीच अनेक जणांची चौकशी केली आहे. खरातला सध्या २२ मे पर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. तपास पूर्ण झाल्यावर सर्वांना उत्तरे मिळतील : चौकशीला सामोरे जाण्यापूर्वी रुपाली चाकणकर यांनी माध्यमांशी संवाद साधला. त्या म्हणाल्या की, अशोक खरात याच्याशी संबंधित अनेक शंका तुमच्या सगळ्यांच्या मनात आहेत. ज्यावेळी हा तपास पूर्ण होईल, त्या तपासातूनच तुमच्या प्रश्नांना उत्तरं मिळतील, असेही त्यांनी स्पष्ट केले. चाकणकर यांनी समता आणि जगदंबा पतसंस्थेतील सर्व खाती बनावट असल्याचा दावा केला. त्या म्हणाल्या की, ती सर्व खाती बनावट आहेत आणि त्याचा अधिकृत अहवाल लवकरच समोर येईल.

## सह आयुक्त डॉ. अनंत गव्हाणे सेवानिवृत्त; सेवाकाळातील योगदानाचा गौरव

छत्रपती संभाजीनगर – विभागीय आयुक्त कार्यालयातील सह आयुक्त डॉ. अनंत गव्हाणे आज नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यांच्या निरोप समारंभात प्रशासनातील विविध अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्याचा गौरव करत भावनिक निरोप दिला. विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित कार्यक्रमात बोलताना विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी डॉ. गव्हाणे यांच्या कार्यपद्धतीचे कौतुक केले. ते म्हणाले, ङ्गडॉ. अनंत गव्हाणे यांनी आपल्या सेवाकाळात प्रामाणिकपणा, शिस्त आणि लोकाभिमुख दृष्टीकोन जपला. त्यांनी विविध जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडत प्रशासनात सकारात्मक ठसा उमटवला. त्यांची काम करण्याची पद्धत आणि सहकार्याची वृत्ती इतर अधिकाऱ्यांसाठी मार्गदर्शक ठरेल. असे सांगून त्यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी डॉ. गव्हाणे यांनीही आपल्या सेवाकाळातील अनुभव सांगत सहकाऱ्यांचे आभार मानले. त्यांनी प्रशासनात काम करताना मिळालेल्या सहकार्यामुळेच जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडता आल्या, असे नमूद केले. यावेळी अपर आयुक्त रिता मेत्रेवार, अपर आयुक्त खुशालसिंह परदेशी व प्रताप काळे उपस्थित होते. तसेच त्यांच्या पत्नी सौ. सुषमा गव्हाणे, मुलगा डॉ. निखिल तसेच कुटुंबीय उपस्थित होते.

## स्वामिनी प्युअर व्हेज फॅमिली रेस्टॉरंटचा जगद्गुरू शांतिगिरीजी महाराज यांच्या हस्ते शुभारंभ

**दिनेश परदेशी, संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

पिसादेवी हरसुल येथील आई साहेब चौकाजवळच स्वामिनी प्युअर व्हेज रेस्टॉरंट, पार्टी हॉल व फॅमिली रेस्टॉरंटचा शुभारंभ जगद्गुरू जनार्दन स्वामी महाराजांचे उत्तराधिकारी जगद्गुरू स्वामी शांतिगिरीजी महाराज यांच्या हस्ते दि. ९ मे रोजी उद्घाटन करण्यात आले. वास्तुत मंत्रोच्चार हवन व इतर धार्मिक विधी पार पाडण्यात आले. यावेळी जगद्गुरू शांतिगिरीजी महाराज यांनी भाविकांना उपदेश दिले. स्वामिनी पिवर व्हेज रेस्टॉरंट च्या शुभारंभ प्रसंगी राजकीय क्षेत्रातील सामाजिक क्षेत्रातील कृषी क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी आधाने परिवाराला शुभेच्छा दिल्या.

इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा व दिव्यांग कल्याण विभाग मंत्री अतुल सावे, खासदार संदिपान भुमरे , माजी मंत्री अब्दुल सत्तार, आमदार अनुराधा ताई चव्हाण, माजी आमदार संजय केनेकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण, नगरसेवक विजय औताडे यांच्यासह अनेक मान्यवरांनी स्वामिनी शुद्ध शाकाहारी रेस्टॉरंटला शुभेच्छा दिल्या.

स्वामिनी रेस्टॉरंटचा हा सोहळा पूर्णपणे धार्मिक सोहळा होता त्यामुळे शुभारंभ एकदमच थाटात झाला. या कार्यक्रमाला भक्ती गीतांची साथ मिळाली ती राहुल शिंदे यांची सुमधुर स्वरात त्यांनी सर्वांना मंत्रमुग्ध केले. स्वामिनी रेस्टॉरंटचे संचालकांनी आलेल्या सर्व मान्यवरांचे मनापासून आभार मानले व अशीच साथ आम्हाला द्यावी असेही ते म्हणाले.



हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199